संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१:
17 MAY 2019
प्राप्त झाले सही...........

सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत .

श्री.रविंद्र ना.जोगी, लेखाअधिकारी

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश, क्र:- संलेको २०१९/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-२
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १५ मे, २०१९.

संदर्भ:- १) लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे क्र. संलेको/५.२०१८/प्रशा राप/का-४/ नियतकालीक बदली/४७८/२०६८, दि.३१.७.२०१८

२) सहसंचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, अमरावती यांचे आदेश क्र. ससंलेको/अम/आस्था-२/वै.नस्ती.श्री.र.ना.जोगी, लेखाअधिकारी/१५२७/२०१८, दि.३०.६.२०१८

३) सहसंचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, अमरावती यांचे आदेश क्र. ससंलेको/अम/आस्था-२/वै.नस्ती.श्री.र.ना.जोगी, लेखाअधिकारी/६२६/२०१८, दि.१२.६.२०१८

४) सहसंचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, अमरावती यांचे आदेश क्र. ससंलेको/अम/आस्था-२/वै.नस्ती.श्री.र.ना.जोगी, लेखाअधिकारी/१७४१ अ/२०१८, दि.३१.७.२०१८

५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे आदेश क्र. ससंलेको/अम/आस्था-२/ वै.नस्ती.श्री.र.ना.जोगी, लेखाअधिकारी/३५७/२०१९, दि.१३.२.२०१९

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखाअधिकारी संवर्गातील श्री.रविंद्र ना.जोगी हे सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती कार्यालयात लेखाअधिकारी पदी कार्यरत असतांना त्यांची लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांच्या संदर्भिय क्र.१ च्या आदेशान्वये विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे बदली करण्यांत आली. त्यानुसार, बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी श्री.जोगी यांना सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती कार्यालयाने संदर्भिय क्र.२ च्या आदेशान्वये दि.३०.६.२०१८ (म.नं.) रोजी कार्यमुक्त केले.

२. श्री.जोगी, लेखाअधिकारी हे बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी गेले असता, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी श्री.जोगी यांना हजर करुन घेतले नाही. त्यामुळे, सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती कार्यालयाने श्री.जोगी यांना संदर्भिय क्र.३ च्या आदेशान्वये दि.९.७.२०१८ (म.पू.) हजर करुन घेतले आहे.



Scanned by CamScanner

३.	सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती कार्यालयाने श्री.जोगी, लेखाअधिकारी यांना विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती या पदावर होण्यासाठी संदर्भिय क्र.४ च्या आदेशान्वये कार्यमुक्त केले. त्यानुसार, श्री.जोगी यांनी बदलीच्या पदावर हजर होऊन, दि.१.८.२०१८ (म.पू.) पासून लेखाअधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती या पदाचा पदभार स्विकारला आहे. दरम्यानच्या कालावधीत श्री.जोगी, लेखाअधिकारी हे पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असतांना त्यांना दि.२.७.२०१८ ते दि.७.७.२०१८ पर्यंत ६ दिवसांची अर्जित रजा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांनी संदर्भिय क्र.५ च्या आदेशान्वये मंजूर केली आहे.

४.	श्री.जोगी, लेखाअधिकारी यांना दि.९.७.२०१८ ते दि.३१.७.२०१८ पर्यंत एकूण २३ दिवस पदस्थापनेशिवाय रहावे लागले. यामध्ये त्यांचा कोणताही सहभाग नाही. त्यामुळे, सदर २३ दिवसांचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित होणे आवश्यक आहे.

५.	तरी, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतूदीच्या अधीन राहून श्री.रविंद्र ना.जोगी, लेखाअधिकारी यांना दि.९.७.२०१८ ते दि.३१.७.२०१८ पर्यंत २३ दिवसांचा कालावधी सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी म्हणून मंजूर करण्यांत येत आहे. सदर कालावधीचे वेतन व भत्ते आहरीत करण्यास सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( माधवी गांधी )
अवर सचिव, वित्त विभाग

प्रति -

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती*
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा ) १/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर*.
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई*
प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
श्री.रविंद्र ना.जोगी, लेखाअधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती*
संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख*
संबंधित अधिकारी वैयक्तिक नस्ती*
निवडनस्ती, (कोषा.प्रशा - २)
**(संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत) ***

Scanned by CamScanner